दैनिक

# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## प्रफुल्ल पटेल-सुनील तटकरेंची पार्थ पवारांकडून पाठराखण

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत चर्चांना आता नवं वळण मिळालं आहे. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यादरम्यान प्रफुल्ल पटेल यांच्या अनुपस्थितीवरून रंगलेल्या चर्चांमध्ये पार्थ पवार यांनी उडी घेत, पटेल आणि सुनिल तटकरे यांच्यावरील आरोप पूर्णपणे निराधार असल्याचा ठाम दावा केला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वातावरण अधिक तापलं आहे.

पार्थ पवार यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांच्याविरोधात सुरू असलेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचं म्हटलं आहे. अनेक दशकांपासून या नेत्यांनी पक्षासाठी दिलेलं योगदान मोठं असून, त्यांच्या नेतृत्वामुळेच पक्षाला दिशा मिळत असल्याचं पार्थ पवार यांनी नमूद केलं. तसेच, केवळ तर्क-वितर्कांवर आधारित कथा पसरवून वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य करणं अत्यंत दुर्दैवी असल्याची टीकाही त्यांनी केली.


(वर्ष ६५ वे अंक ९३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.०३ एप्रिल २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# राज्यात अवकाळीचा कहर; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## हातातोंडाशी आलेला घास हिरावला; मदतीची मात्र प्रतिक्षाच

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राज्यातील अनेक जिल्ह्यात विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही पावसाने दमदार आगमन केले. कडक उन्हाळ्याने नागरिक त्रस्त झाले असतानाच त्यांना पावसाच्या हलक्या सरींनी गारवा अनुभवायला मिळाला. मात्र, अवकाळी आलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंतेत असल्याचं दिसून आलं. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झालं आहे. फळभाज्या, पाल भाज्यासह कलिंगडाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालं.

भंडाऱ्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाची हजेरी झाली. उन्हाळी भात पिकाला याचा फायदा होणार असला तरी, कापणीला आलेलं पीक आणि पालेभाज्यांना याचा काही प्रमाणात फटका बसणार आहे. मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या गारपीट अवकाळी पावसामुळे १२२ गावांतील ५ हजार ४०९ शेतकऱ्यांना फटका बसला असून, ३ हजार २६१ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. त्यात सर्वाधिक २ हजार ६६५ हेक्टरवरील नुकसान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहे.

बीडमध्येही अवकाळी आणि गारपिटीचा फळबागांना फटका, फळ गळतीने बागांचे नुकसान झाले आहे. तसेच, धाराशिव जिल्ह्यात देखील अवकाळीचा पुन्हा तडाखा बसला, वादळवाऱ्याने आणि गारपिटीने आंब्याला मोठा फटका बसला असून बळीराजाचं नुकसान झालंय. लातूरमध्ये अवकाळी पावसाने टोमॅटो उत्पादकांचे कंबरडे मोडले असून खराब झालेले टमाटे उकिरड्यावर फेकण्याची वेळ आलीय. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पावसाचा तडाखा बसला, ज्यामध्ये हजारो हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. वाशिम जिल्ह्यातही वादळी वारा आणि पावसामुळे बिजवाई कांद्याचे नुकसान झाले. नागपूर जिल्ह्याला मध्यरात्री अवकाळी पावसाने चांगले झोडपले, सतत दोन तास झालेल्या या पावसाने विशेष करुन पाल भाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

पुणे शहरात गुरुवारी दुपारनंतर अचानक हवामानात मोठा बदल झाला आणि भर उन्हातच काळोख दाटून आला. त्यानंतर काही मिनिटांतच मुसळधार पावसाने शहराला झोडपून काढले. अनेक भागांमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला, तर काही ठिकाणी गारपिटीची नोंदही झाली. या अचानक बदलामुळे शहरातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाल्याचे चित्र दिसून आले. पुण्यात सिंहगड रोडवरील नवश्या मारुती मंदिरा शेजारील पिंपळाचे भले मोठे वृक्ष कोसळले. यात साठ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे.

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा आणि साक्री तालुक्याला पुन्हा एकदा अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला. तर, नागपूरातील कळमना एपीएमसी मार्केटमध्ये अवकाळी पावसात शेकडो पोती धान्य भिजलं. धाराशिवमध्ये पुन्हा वादळी वाऱ्यासह अवकाळीचा तडाखा बसला. टॉमेटो शेती जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांच मोठ आर्थिक नुकसान झालं आहे. कळंब तालुक्यातील बहुला शिवारातील शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकाचेही मोठं नुकसान झालं आहे.

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पाऊस झाला असून पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असून नुकसानभरपाई देण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.



आज पुण्यात झालेल्या पावसाने शहरातील मुख्य रस्त्याला तलावाचे स्वरुप आले होते.

## पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली जाईल-कृषिमंत्री

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून (३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, असे त्यांनी म्हटले.

## तुम्हाला 'अश्मयुगात पोहोचवू' ट्रम्प यांच्या धमकीला इराणचे सडेतोड उत्तर

तेहरान दि.२ (वृत्तसंस्था)- मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अश्मयुगात पोहोचवू असा इशारा दिला आहे. यानंतर आता इराणच्या लष्कराने ट्रम्प यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. इराणच्या खातम अल-अंबिया सेंट्रल मुख्यालयाच्या प्रवक्त्याने एका निवेदनात अमेरिका आणि इस्त्रायली सैन्याच्या विरोधात 'प्रखर, व्यापक आणि अधिक विनाशकारी' हल्ले करण्याची धमकी दिली आहे. तसेच इराणच्या लष्करी क्षमता मोठ्या प्रमाणात कमकुवत झाल्याचा ट्रम्प यांचा दावादेखील फेटाळून लावला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी येत्या दोन ते तीन आठवड्यांत अमेरिका इराणला पुन्हा अश्मयुगात पाठवेल, जिथे त्यांची खरी जागा आहे, असे म्हणाले होते. तसेच ट्रम्प यांनी अमेरिकन सैन्य आपली युद्धातील सर्व उद्दिष्टे अतिशय कमी कालावधीत साध्य करेल, असा दावाही त्यांनी केला होता. याच्या काही तासांतच इराणकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

"आमची लष्करी ताकद आणि उपकरणांबाबत तुमची माहिती अपूर्ण आहे. आमच्या अफाट सामरिक क्षमतांबद्दल तुम्हाला काहीही माहिती नाही," असे इब्राहिम झोल्फाघारी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

ट्रम्प यांच्या दाव्याला थेट उत्तर देताना झोल्फाघारी यांनी अमेरिकेला इशारा दिला की, अमेरिकेन सैन्याने इराणचे सामरिक क्षेपणास्त्र निर्मिती केंद्र उद्ध्वस्त केले असल्याचे अमेरिकेने गृहित धरू नये. तसेच त्यांनी इराणची क्षेपणास्त्र निर्मिती सुविधा, लांब पल्ल्याचे हल्ले आणि अचूक हल्ला करणारे ड्रोन्स, मॉडर्न एअर-डिफेन्स सिस्टम्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर क्षमता यासारखे महत्त्वाचे (पान ४ वर)

## अशोक खरातच्या फरार पत्नीविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी; परदेशात पळून जाण्यास नाकाबंदी

अहिल्यानगर दि.२ (प्रतिनिधी)- शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातवर एका मागोमाग एक गुन्हे दाखल होत आहेत. अनेक पीडित महिला समोर येऊन खरातविरुद्ध गुन्हा नोंदवत असून काहींनी फसवणूक व आर्थिक व्यवहाराबाबतही तक्रारी दिल्या आहेत. विशेष म्हणजे, अशोक खरात हा सावकारकीचाही धंदा करायचा, त्यामध्ये त्याची पत्नी देखील भागिदार होती. त्यामुळे, त्याच्या पत्नीविरुद्ध देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होताच कल्पना खरातने धूम ठोकली. आता, अशोक खरातची फरार पत्नी कल्पना खरात हिच्याविरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली. त्यामुळे, कल्पना खरात परदेशात पळून जाण्याचा मार्ग बंद झाला आहे.

शिर्डी पोलिसांकडून कल्पना खरातविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी करण्यात आल्याने आता देशातील सर्वच विमानतळावरुन संबंधित व्यक्तीला विदेशी प्रवासाची बंदी घालण्यात आली आहे. शिर्डीत भोंदू अशोक खरातसह पत्नीवर शेतकऱ्याची फसवणूक आणि सावकारकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यानंतर (पान ४ वर)

## भारत आमचा मित्र, काळजी नसावी; होर्मुझप्रकरणी इराणचा भारताला दिलासा

तेहरान दि.२ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इस्त्रायल यांनी केलेल्या हल्ल्यानंतर इराणने जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला समुद्री मार्ग रोखून धरला आहे. यानंतर मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्ष सध्या शिगेला पोहोचला असून याची झळ जगभरातील देशांना बसत आहे. यादरम्यान इराणने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टच्या माध्यमातून एक खास संदेश जारी करत होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत भारताला आश्वस्त केले आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर 'इराण इन इंडिया' या हँडलने एक पोस्ट केली आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की, "आमचे भारतीय मित्र हे सुरक्षित हातात आहेत, काळजी नसावी." असाच एक संदेश सौदी अरेबियातील इराणच्या दूतावासाने देखील शेअर केला आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "होर्मुझच्या सामुद्रधुनीचे भविष्य फक्त इराण आणि ओमान ठरवतील." तसेच या पोस्टमध्ये, "तुम्ही सुरक्षित हातात आहात, काळजी नसावी," असेही म्हटले आहे.

इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फथाली यांनी नुकतेच केलेल्या एका महत्त्वाच्या वक्तव्यानंतर पार्श्वभूमीवर ही पोस्ट करण्यात आली आहे. पश्चिम आशियामध्ये संघर्ष सुरू असला तरी इराण भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देईल, असे फथाली म्हणाले होते. नवी दिल्ली येथे बोलताना फथाली यांनी भारताचा उल्लेख हा इराणचा एक 'विश्वासू भागीदार' म्हणून केला होता. तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करताना भारतीय जहाजांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील एक प्रमुख वाहतूक मार्ग असून, एकूण जगातिक तेल पुरवठ्यापैकी एक मोठा हिस्सा (पान ४ वर)

## सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य; सर्वोच्च न्यायालयाने बंगाल सरकारला फटकारले

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- गेल्या काही दिवसांपासून मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी अर्थात एसआयआरचा मुद्दा देशभरात चर्चेत आहे. यावरून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाद उद्भवल्याचं पाहायला मिळालं. या पार्श्वभूमीवरच पश्चिम बंगालमधील एसआयआरचा मुद्दा थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेला आहे.

यातच काही दिवसांपूर्वी एसआयआरच्या काही अधिकाऱ्यांना एका कार्यालयात ओलीस ठेवल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणावरून आता सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारला फटकारलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालमधील परिस्थितीवर भाष्य करत चिंता व्यक्त केली आहे.

पश्चिम बंगालमधील मालदा या ठिकाणी एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या घटनेवर सर्वोच्च (पान ४ वर)

## भोंदू अशोक खरातचा आणखी एक आर्थिक घोटाळा उघड

### रुपाली चाकणकरांच्या बहिण अन् पुतण्याच्या नावे बनावट अकाऊँट

शिर्डी दि.२ (प्रतिनिधी)- भोंदू अशोक खरात याच्या फसवणूक प्रकरणाचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी धक्कादायक माहिती समोर येत आहे. शिर्डीतील गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांच्या हाती मोठा आर्थिक घोटाळा लागला असून, खरातने तब्बल १३० बनावट बँक खाती उघडून कोट्यवधी रुपयांची उलाढाल केल्याचे उघड झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२१-२२ या कालावधीत विविध व्यक्तींच्या नावाने पतसंस्थांमध्ये ही खाती उघडण्यात आली होती. समता पतसंस्था आणि जगदंब पतसंस्था यांसह अनेक ठिकाणी ही बनावट खाती तयार करण्यात आली होती. धक्कादायक बाब म्हणजे या सर्व खात्यांमध्ये अशोक खरात यालाच 'नॉमिनी' म्हणून दाखवण्यात आले होते. या खात्यांतून एका दिवसात लाखो रुपयांचे व्यवहार होत असल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे.

या बनावट खात्यांमधून एकूण व्यवहाराची रक्कम ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, या खात्यांमध्ये काही प्रभावशाली व्यक्तींच्या नातेवाईकांच्या नावांचाही वापर करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. जासूद आणि चाकणकर यांच्या भगिनी व पुतण्यांच्या नावानेही खाती उघडण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याशिवाय काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचाही वापर करण्यात आल्याची शक्यता तपासात पुढे आली आहे.

दरम्यान, (पान ४ वर)

## अशोक खरात ८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांचे धागेदोरे आता अधिक खोलवर जात आहेत. खरातवर असलेल्या प्रचंड रागामुळे आणि त्याच्या जीवाला असलेला धोका लक्षात घेता, आजची न्यायालयीन सुनावणी अत्यंत कडक बंदोबस्तात व्हिडिओ कॉन्फरन्सिग द्वारे पार पडली. विशेष तपास पथकाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने खरातला ८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

तपास अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी यांनी सुरक्षेच्या कारणास्तव खरातला न्यायालयात आणणे जोखमीचे असल्याचे अर्जाद्वारे कळवले होते. न्यायालयाने ही विनंती मान्य केल्याने कोर्ट रूममध्ये चार मोठे स्क्रीन बसवून सुनावणी पार पडली. यावेळी आरोपी खरात, न्यायाधीश आणि वकील यांच्यात थेट संवाद झाला.

सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात खरातच्या कृत्यांचा पाढा वाचला. खरातने एका महिलेला "तू अप्सरा आहेस" असे सांगून धार्मिक भुरळ घातली आणि तिचे लैंगिक शोषण केले. या अत्याचारातून पीडिता गर्भवती राहिली असता, खरातने तिला अज्ञात गोळ्या आणि जडीबुटीचे औषध देऊन तिचा गर्भपात घडवून आणला. हे औषध त्याने कुठून आणले आणि यामागे आणखी कोणाचे (पान ४ वर)

## ब्रिटिश पंतप्रधानांनी भारताला होर्मुझ शिखर परिषदेसाठी बोलावले; मार्ग खुला करण्यावर चर्चा होणार, ३५ देशांची बैठक

लंडन दि.२ (वृत्तसंस्था)- 'होर्मुझची सामुद्रधुनी' खुली करण्यासाठी ब्रिटन पुढाकार घेत आहे. ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टॉर्मर यांनी या उपक्रमात भारताला भागीदार म्हणून समावेश केले असून, भारताला चर्चेसाठी आमंत्रित केले आहे. या चर्चेत ३५ प्रमुख देश सहभागी होत आहेत. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री भारताच्या वतीने आभासी पद्धतीने सहभागी होत आहेत.

ब्रिटनची होर्मुझ शिखर परिषद ही पंतप्रधान कीर स्टारमर यांच्या सरकारने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी सुरू केलेली एक बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय बैठक आहे. इराण युद्ध सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच इराणच्या लष्कराने, आयआरजीसीने, होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली किंवा त्यावर नियंत्रण मिळवले. याचा परिणाम भारत, चीन, जपान, मलेशिया आणि इंडोनेशियासह अनेक देशांच्या पेट्रोल आणि डिझेल पुरवठ्यावर झाला आहे.

यानंतर, ब्रिटिश पंतप्रधानांनी हा मार्ग पुन्हा सुरू करण्याचा पुढाकार घेतला आहे. ही शिखर परिषद पश्चिम आशियाई संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होत आहे, या संघर्षामुळे जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल (पान ४ वर)

## दररोज कोलांटउड्या मारणे बंद करा

### फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना सुनावले

सियोल दि.२ (वृत्तसंस्था)- मागील काही दिवसांपासून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत असलेली विधाने सगळ्यांनाच बुचकळ्यात पाडत आहेत. ट्रम्प यांच्या सततच्या कोलांटउड्यावरून फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्यूएल मॅक्रॉन यांना आपला संताप आवरता आला नाही. 'दररोज आपल्याच विधानांविरोधात बोलणं चालू शकत नाही', असे मॅक्रॉन ट्रम्प यांना म्हणाले.

पाच दिवसांसाठी हल्ले थांबवण्याची घोषणा केल्यापासून डोनाल्ड ट्रम्प दररोज वेगवेगळ्या भूमिका मांडू लागले आहेत. आधी इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांच्यावर सडकून टीका करणारे ट्रम्प आता त्यांचे कौतुक करत आहेत. युद्ध थांबवणार असे म्हणत आहेत आणि मध्येच इराणला बेचिराख करू असेही म्हणत (पान ४ वर)

## शिंदेंच्या शिवसेनेसह अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपमध्ये विलीन होणार-संजय राऊत

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- सुनेत्रा पवार यांचा पक्ष वेगळा आहे. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल हे अजित पवार यांचे सहकारी होते. ते सुनेत्रा पवारांचे सहकारी असतीलच असे नाही. त्यांच्या पक्षाच्या अंतर्गत गोष्टीवर दुसऱ्या पक्षाने का बोलावे. त्यांनी पत्रात काय लिहले हा त्यांचा विषय आहे. भविष्यात हा पक्ष २५ ते ३० आमदारांसह भाजपमध्ये विलीन होईल, त्यासोबतच शिंदेंचेही २५ ते ३० आमदार भाजपमध्ये विलीन होतील, त्यांची तशी मानसिकता आहे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, त्या आमदारांना काळी काळ थांबण्यासाठी सांगण्यात आले आहे. या दोन्ही पक्षाला भाजपमध्ये विलीन व्हावेच लागेल. शिवसेना पक्ष-चिन्हावरील सुनावणी प्रत्येकवेळी पुढे ढकलली जाते. मग सुप्रीम कोर्टावर विश्वास कोण ठेवणार? ५०-५० वेळा घटनात्मक पीठ असलेल्या खटल्याच्या सुनावण्या पुढे ढकलल्या जातात. हे काम मुख्य न्यायाधीश करतात. हे नरेंद्र मोदी, अमित शहांचे गुलाम झाले आहे. या प्रकरणी एकदाच निर्णय देता येत नाही का? असा सवाल राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, न्याय व्यवस्था ही राजकारण्याच्या दबावाखाली आहे. तसे नसते तर गौतम अदानींच्याविरोधात इतके खटले सुप्रीम कोर्टात गेले आणि एकाही खटल्यात ते हरले नाही. शिवसेना, राष्ट्रवादीच्या (पान ४ वर)

# ज्यांचे अंत:करण शुद्ध त्यांचे आचारण शुध्द

या भूतलावरील प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कारणाने, कृतीने, कार्याने अशुध्द वृत्तीची व अशुध्द अंत:करणाची झालेली आहे. असे जरी असले तरी पापी आहे, कपटी आहे. दृष्ट आहे असे म्हणता येणार नाही. कळत न कळत मनुष्याच्या व्दारे चुका होतात एखादे कर्म वाईट घडते. मात्र केलेल्या अपकर्माची जाणीव होवून पश्चाताप होणे व प्रभूजवळ क्षमा मागणे म्हणजे अंतकरण शुध्दी होय. मात्र भविष्यात पुन्हा असे काही विपरित घडणार नाही याबाबत दक्ष राहणे व प्रभू जवळ कबुली देणे गरजेचे असते.

मनुष्याने केलेल्या दृष्यकृत्याचा, केलेल्या पापाचा कायम चा त्याग करून पश्चाताप करावा व प्रभुचरणी क्षमा याचना करून पुन्हा असे घडणार नाही याची ग्वाही द्यावी, सन्म ार्गाने चालून शुध्द मन व शुध्द आचरण ठेवावे व लोकांच्या हितार्थ, लोकांच्या सुखार्थ प्रयत्नशील असावे असे प्रभू येशूस या भूतलावरील लोकांकडून अपेक्षित होते. ततलीन असावे असे प्रभू येशूस या भूतलावरील लोकांकडून अपेक्षित होते. तत्कालीन समाजव्यवस्थेतील लोकांना प्रभू येशूचा हा संदेश मनापासून आवडला. बऱ्याच लोकांनी हा संदेश अंमलात आणून आपल्या जीवनाची केलेल्या पापापासून मुक्ती करवून घेतली. काहींनी दुर्लक्ष केले यामुळे त्यांना सातत्य जीवनातील विविध क्षेत्रात यश, समृद्धी व संपन्नता मिळत गेली व ते आनंदी जीवन जगले.

प्रभू येशूचा जन्म या भूतलावर पापी लोकांना पापापासून मुक्त करण्यासाठीच झाला होता. मनुष्याने आपले जीवन आपले जीवन कार्य शुध्द, पवित्र, मंगलमय, निष्कलंक व आनंदी ठेवावयास हवे. कारण अशा लोकांवरच प्रभूच्या कृपेचा सातत्याने वर्षाव होत असतो. प्रभू येशूने या भूतलावर जन्म घेवून पापी लोकांना तारण्याचा त्यांना पापापासून मुक्त होण्याचा शुध्द व पवित्र मार्ग दाखविला. प्रभू येशूने पापी लोकांना तारले व त्यांना सुमार्ग दाखविला.

व्यक्तीच्या अंत:करणात सदोदित शुध्द भाव असावयास हवेत. मनाची शुध्दता, मनाची पवित्रता असेल तर त्या व्यक्तीचे आचरण ही शुध्द व पवित्र असतेच. यासाठी प्रत्येकाने आपले अंत:करण शुध्द व मंगलमय ठेवून इतरांशी वागावे असे वागणे हे शुध्द आचरणाचे असेल व अशी व्यक्ती ही भाग्यवंत व यशवंत निश्चितच असते. अशा व्यक्तीच्या शुध्द अंत:करण व शुध्द आचरणाने प्रभूही प्रसन्न होतात असे मानल्या जाते. या भूतलावरील आपण सर्व स्वर्गातील परमपिता परमेश्वराचीच लेकरे आहोत मग असे असताना एकमेकाबद्दल व्देष, तिरस्कार, कपटी भाव कशाबद्दल हवी? आपल्या पित्याने आपणाला सद्बुध्दी सद्ववर्तन, सद्विचार, सद्गती दिलेली आहे. यामुळे पित्याच्या व देणगीचा आपण चांगला उपयोग करू, सर्वांसाठी सत्कर्म करू, पाप मुळीच न करता सर्वत्र पुण्यकर्म करू व पित्याच्या देणगीचा योग्य उपयोग करू अशाने परमपिता परमात्मा आनंदी होतील एवढे निश्चित. परमेश्वराने प्रभू येशूच्या रूपाने एक अद्भूत व दिव्य शक्ती या भूतलावर पाठविली. प्रभू येशूने अत्यंत मांगल्यमयय पवित्रमय जनहितासाठीचे दीन दुबळयांच्या सेवेचे लोककल्याणाचे जीवन जगून एक आदर्श जीवनाचा पाढा या भूतलावरील लोकांना घालून देण्याचा प्रयत्न केला. प्रभू येशू पवित्र व मंगलमय जीवन जगले तसे मानवांनी ही जीवन जगावे अशी त्यांची इच्छा होती कारण अशा जीवनात जगण्याचा आनंद असतो तो घ्यावयाचा असतो. प्रभू येशू शुध्द, पवित्र व निष्कलंक जीवन जगले व शेवटी मानव जातीच्या उध्दारासाठी पापी लोकांच्या तारणासाठी वधस्तंभावर त्यांनी आपला प्राण अर्पण केला. अशा या प्रभूच्या जीवन मार्गाचा अवलंब प्रत्येकाने करून समाजात शांतता सुबता व मानवतेचे कार्य करावे. आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडून 'जनसेवा' हीच ईश्वर सेवा' मानून जीवन जगावे अशी अपेक्षा आहे. आज जग भरकटत आहे. मानवता, माणूकी, माणूसपण, जिव्हाळा, चांगूलपणा, पवित्रता, शुध्दता या चांगल्या वृत्ती समाजातून व समाज मनातून झपाट्याने लोप पावत आहेत. जगात शांती, स्नेह, बंधूभाव, आपुलही प्रेम हवे असेल गुड प्रफायडेच्या मंगल आणि शुभसंदेशाचा दीपक विश्वाला दाखवू व प्रभूच्या संदेश जनाजनाच्या मनावर बिंबवण्याचा सर्वंकष प्रयत्न करू या.

# गुड फ्रायडेचा संदेश

आज या भूतलावरील प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनातील कोणत्या ना कोणत्या कटू कारणाने, कृतीने, किंवा चुकून एखादी दुर्दैवी घटना घडली त्या कारणे किंवा चुकून एखाद्या व्यक्तीचे मन दुःखाल्या गेले त्या कारणे मनस्वी खूप दुःखी आहे. म नात,विचारात किंवा कृतीत काही स्वार्थ नसतानाही एखादी घटना घडते यामुळे ही मन खूप दुःखी होतात.काही व्यक्ती मुद्धामहून काही बाबी काही गोष्टी अंगावर ओढवून घेतात त्या कारणेही दुः खी होतात, व आपल्या जीवनातील आनंद, समाधान गमावून बसतात.काही चुकीच्या घटना कळत न कळत व्यक्तिद्वारे होऊन जातात. ध्यानी मनी नसतांना ही एखादे कर्म वाईट घडते. अशा समयी केलेल्या वाईट कर्माची किंवा घटनेची जाणीव होईन पश्चाताप होणे व ह्या चुकांची प्रभू जवळ क्षमा याचना करणे व पुन्हा अशी चूक कदापिही होणार नाही याची कबुली प्रभू प्रतिमा किंवा मूर्ती समोर करणे म्हणजे आत्म शुद्धी होय. किंवा आत्मशुद्धीकरण होय. भविष्यात अशी चूक पुन्हा होणार नाही या बाबत दक्ष राहणे व प्रभुजवळ कबुली देणे गरजेचे होय.हाच प्रभू येशूचा 'गुड फ्रायडेचा-गुड संदेश 'होय. या भूतलावरील सर्वच मानव जातीने सुमार्गाच्या वाटेवर चालून शुद्ध मन व शुद्ध आचरण ठेवावे व लोकांच्या हितार्थ व लोकांच्या सुखार्थ व भल्यासाठी सदासर्वदा प्रयत्नशील असावे यालाच गुड संदेश -यालाच शुभ संदेश असे म्हणतात.याच बाबी प्रभू येशूना या भूतलावरील लोकांकडून अपेक्षित होत्या. बऱ्याच लोकांना प्रभू येशूंचा हा संदेश आवडला व आपण केलेल्या अमानवीय व पापी कृत्यांपासून आपली सुटका करवून घेतली.यामुळे त्यांना जीवनात यश,समृद्धी, सुख व समाधान मिळत गेले व ते आनंदी जीवन जगले. प्रभू येशूंचा जन्मच मुळी पापी लोकांना तारणे या साठी होता. या भूतलावरील लोकांनी आपले जीवन कार्य, शुद्ध, पवित्र, मंगल व निष्कलंक ठेवावे अशा लोकांवरच प्रभू येशूच्या कृपेचा सदैव वर्षाव होत असतो. शुभ संकल्प, शुभ चिंतन, शुभ वर्तन, शुभ विचार, शुभ भाव, शुभ दृष्टी हीच आनंदी व सुखी जीवनाची गुरुकिल्ली होय.प्रभू येशूच्या शुभ तत्वांना,शुभ चिंतनाला, व शुभ संदेशाला जीवनात उतरवून माणसांनी, माणसांशी,माणसाप्रमाणे वर्तन ठेऊन जीवन जगण्याचा आनंद घेऊ या.हा' गुड फ्रायडेचा गुड संदेश 'सर्वांपर्यंत पोहचवू या.

– धोंडीरामसिंह राजपूत

# अजितदादांच्या मृत्युवर अधिवेशनात चर्चाच नाही

**महाराष्ट्र** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजले. पाच आठवडे पण प्रत्यक्षात वीस बैठका झाल्या. या काळात १९७ तास ३७ मिनिटे कामकाज झाले. पण माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्युविषयी चर्चा झाली नाही. विरोधी पक्षांनी अजितदादांच्या मृत्युवर चर्चा घडविण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी , अजितदादांच्या विमान दुर्घटनेत घातपात किंवा कारस्थान असल्याचे आढळल्यास सरकार आकाश पाताळ एक करीन व यामागे कुणीही असले तरी त्याचा मुडदा खणून काढला जाईल, असे ठणकावून सांगितले.

अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री होते, अर्थमंत्री होते. तब्बल अकरा वेळा त्यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस ( अप ) या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. महायुती सरकारमधील घटक पक्षाचे प्रमुख होते. शरद पवारांचे पुतणे हे नाते तर राज्यात घराघरांत सर्वांना ठाऊक होते. २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळावर झालेल्या विमानअपघातात त्यांचा मृत्यू झाल्यानंतर सर्वत्र संभ्रमाचे वातावर निर्माण झाले, त्यांचा मृत्यु हा अपघात की घातपात ? या विमान अपघातामागे दोषी कोण आहे ? ब्लॅक बॉक्स जळाला की सुरक्षित आहे ? तिथे झाडच नाही मग विमान झाडावर कसे आदळले ? व्हीएसआर विमान कंपनीच्या सेवेबद्दलही अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. कंपनीचे मालक मोकाट कसे ? इथपासून त्यांच्या मृत्यूमागे कोणी काळी जादू केली आहे काय ? इत्यादी प्रश्नांचा व शंका कुशंकांचा गेले दिड पावणे दोन महिने भडिमार होत आहे. मुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका मांडली, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवेदन केले पण या संवेदनशील विषयावर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चर्चा का झाली नाही ? सरकारची इच्छा नव्हती ? अजितदादांच्या मृत्युच्या घटनेची तीव्रता कमी झाली ? की चर्चेसाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी विरोधी पक्ष कमी पडला ?

अजितदादांच्या विमान अपघाती मृत्युला



नेमके कोण जबाबदार आहे, असा प्रश्न सरकारला विचारण्याची संधीच विरोधी पक्षाला मिळाली नाही. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही. विरोधी पक्षा्च्या बाकांवरून सरकारला कठोर शब्दात जाब विचारणारे कोणी नाही. गेले दिड महिना आमदार रोहित पवार अजितदादांच्या मृत्युची सखोल व पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी मुंबई -दिल्लीत सर्वत्र वणवण फिरत होते. सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही ते भेटले. ते अजितदादांचे पुतणे असल्याने त्यांची त्यामागे तळमळ आहे हे समजू शकते पण विधिमंडळात अजितदादांचा पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही चर्चेसाठी आग्रह धरला असे दिसले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष सत्तेत सहभागी आहे. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री आहेत व त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. प्रफुल पटेल व सुनिल तटकरे हे दोन्ही नेते मुख्यमंत्र्यांशी थेट बोलू शकतात. तरीही दादांच्या मृत्युवर पाच आठवड्याच्या अधिवेशन काळात सभागृहात चर्चा होऊ नये याचे आश्चर्य वाटते.

रोहित पवार यांनी मुंबईतील मरिन ड्राईव्ह पोलीस स्टेशनवर अजितदादांच्या मृत्युप्रकरणी एफआयआर नोंदण्यिाचा प्रयत्न केला. पण तेथे त्यांनाच नकार देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी जी उत्तरे दिली ती चिंताजनक होती. नंतर रोहित यांनी बारामतीला जाऊन तेथे पोलीस स्टेशनवर एफआयआर नोंदविण्याचा प्रयत्न केला तिथेही त्यांना नकार देण्यात आला. अजितदादांच्या मृत्युनंतर महाराष्ट्रात पोलिसांकडे एफआयआर सुध्दा नोंदवला गेलेला नाही. राष्ट्रवादीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले , रोहित पवार यांनीही त्यांची भेट घेतली , अजितदादांच्या मृत्युची चौकशी सीबीआयकडे सोपवावी अशी त्यांनी मागणी केली. पुढे काय झाले, सीबीआय कडे चौकशी सोपविण्यात आली का ? याची कोणतीही माहिती पुढे आलीच नाही. ज्या अजितदादांनी त्यांच्या हयातीत हजारो लोकांना न्याय दिला, सामान्यांना आधार दिला, स्वत:च्या पायावर उभे केले, त्यांच्या आकस्मिक अपघाती मृत्युच्या चौकशीसाठी राजकीय उदासिनता दिसते, हे अतिशय वेदनादायी आहे. राहुल गांधी यांच्या सल्लृयावरून रोहित पवार यांनी कर्नाटकातील बंगळुरू पोलीस स्टेशनवर अजितदादांच्या मृत्युविषयी एफआयआर नोंदवला. ही बाब अर्थातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खटकली. रोहित पवारांनी तर एफआयआरची प्रत सभागृहातच दाखवली तेव्हा भाजपाच्या सदस्यांनी त्याला आक्षेप घेतला. महाराष्ट्रात एफआयआर नोंदवला जात नाही आणि कर्नाटकमधे झिरो एफआयआर नोंदवला जातो हा महाराष्ट्राचा अवमान आहे. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार आहे. महाराष्ट्राची देशात मानहानी व्हावी म्हणून तेथे झिरो एएफआयआर नोंदवला गेला आहे. कर्नाटकात राजकीय सूड बुध्दीने एफआयआर नोंदवला आहे, अशीही टीपणी मुख्यमंत्र्यांनी केली. महाराष्ट्रात तपास नीट चाललेला नाही, हे दाखविण्यासाठी बंगळुरूमधे एफआयआर नोंदविण्यात आला ही बाब मुख्यमंत्र्यांना मुळीच आवडलेली नसावी.

सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री आहेत, त्यांचे पुत्र पार्थ राज्यसभा खासदार झालेत. मग महाराष्ट्रात एफआयआर नोंदवायला पोलीस नकार का देतात? जय पवार यांनीही ९ मार्च रोजी आपण पत्रकार परिषद घेणार आहोत असे म्हटले होते. पण कुणाच्या सल्लृयावरून ती रद्द झाली हेही गुलदस्त्यात आहे. अभिनेता सुशांत सिंग याची मुंबईत झालेली हत्या की आत्महत्या यावरून काही वर्षापूर्वी देशभर वादळ उठले होते. त्याच्या वडिलांनी बिहारमधे पोलीस स्टेशनवर एफआयआर नोंदवला व तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सुशांत सिंग मत्युची चौकशी सीबीआयकडे सोपवावी अशी केंद्र सरकारला शिफारस केली. बिहारमधे एफआयआर नोंदवला म्हणून तेव्हा महाराष्ट्रात कुठे गहजब झाला नव्हता. रोहित पवार यांचे अजितदादा काका आहेत, पण याचा अर्थ त्यांचा कळवळा केवळ तुम्हालाच आहे, असे समजू नका, माझे ते निकटचे मित्र होते, अशा कानपिचक्याही मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी रोहित यांना दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरींनी विधान परिषदेत अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दादांवर केलेली कविता म्हणून दाखवली- माफ करा दादा आम्हाला, तुम्हाला विसरू शकत नाही, अर्थसंकल्पीय अधिवेशनात, तुम्हाला न्याय देऊ शकलो नाहीः. भोंदू बाबा अशोक खरातचे शेकडो व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत, पण अजितदादांचा विमान अपघातात मृत्यु होऊन दोन महिने होत आले तरी साधे सीसीटीव्ही फूटेज पुढे येत नाहीः. अशी खंत त्यांनी बोलून दाखवली.

– डॉ. सुकृत खांडेकर

# डोनाल्ड ट्रम्प मानवतेचा हत्यारा ही बाब अमेरिकेच्या ८० लक्ष नागरिकांनी जगाला पटवून दिली

**जगात** अनेक राजे-महाराजे झालेत, हिटलर सारखे क्रूर शासक सुद्धा झाले. परंतु डोनाल्ड ट्रम्प यांनी या संपूर्ण हद्दी पार करून मानव,पशुपक्षी, वित्तीय हाणी या संपूर्ण बाबींची हद्द पार केल्याचे दिसून येते.डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून दगा दिला ही बाब जगजाहीर आहे आणि तेच काम अमेरिका इराण सोबत युद्ध करून इस्त्रायलच्या बाबतीत करू शकते.कारण अमेरिका कोणाचाच झाला नाही आणि होणार सुध्दा नाही ही बाब त्यांच्या वागणुकीवरून स्पष्ट दिसुन येते.अमेरिकेने सुपर पॉवरच्या नावाखाली जगाला अंधक्कारात नेवून ठेवले आहे व जगातील मित्र देशांना धोका देत आहे.डोनाल्ड ट्रम्प सांगतात की आम्ही जी कारवाई इराणवर करीत आहोत ही मानवतेच्या आणि जगाच्या कल्याणासाठी करीत आहो अशा भुलथापा मारून जगातील देशांची दिशाभूल करण्याचे काम डोनाल्ड ट्रम्प करीत आहे. डोनाल्ड ट्रम्प या युध्दाच्या माध्यमातून इराणला नमविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु इराण अमेरिका-इस्रायलला जशास तसे उत्तर देवून दोघांनाही घाम सोडून त्यांची जागा दाखवित आहे.या युध्दाम ागचा अमेरिकेचा एकच उद्देश आहे तो मिडलिस्टमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे व तेल कंपन्यांनवर आपला कब्जा व्हावा याकरीता इरानच्या ४५० किलो युरेनियमवर त्याचा डोळा आहे.कारण इराणने जर अनुबॉम्ब बनविला तर उत्तर कोरियाचा तानाशाह किंग्ज जॉन उन सारखी वारंवार धमकी इराण आपल्याला नेहमीच देईल अशी भिती अमेरिकेला वाटत आहे. त्याचप्रमाणे या युध्दाच्या माध्यमातून खर्ग आणि होर्मुझवर आपले वर्चस्व रहावे व खाडी देश आपल्या नियंत्रणात राहून तेल उद्योगांवर आपली पकड मजबूत करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विनाशकारी युद्ध छेडल्याचे दिसून येते.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकडीपणाम ुळे आणि अतिरेकामुळे संपूर्ण मिडलिस्ट युद्धाच्या खाईत होरपळत आहे यात आबालवृद्ध, विद्यार्थी, मुल, निरअपराध नागरिक, पशुपक्षी यांना आपले प्राण मुकावे लागत आहे. या युध्दात इराणचा काहीच दोष नाही. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणला मुद्दाम युद्धासाठी उकसविले आणि आज त्याचा जगावर विपरीत परिणाम होऊन आर्थिक, मानवीय, वित्तीय हाणी दिवसेंदिवस गंभीर वाढत आहे. सोबतच या युद्धामुळे रेडियेशन वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.अमेरिका आणि इस्त्रायलला वाटत होते की हे युद्ध ४ ते ५ दिवसांत संपेल परंतु इराण,अमेरिका-इस्रायलचा बाप निघाला आणि अनेक मोर्चावर अमेरिका-इस्त्रायलला परास्त करून जशास तसे उत्तर देत आहे ही इराणच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे. कारण छोटासा देश बलाढ्य देशाला जेव्हा टक्कर देतो तेव्हा बलाढ्य देशांची घाबरगुंडी उडते. या संपूर्ण युद्धजन्य परिस्थिती वरून लक्षात येते की डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहु यांनी सापाच्या बिळात हात टाकून मोठी चूक केली असावी.कारण आज एक महिना झाला तरी इराण अमेरिका-इस्त्रायलवर वार-पलटवार सुरूच आहे त्याच्या बहादुरीची सराहना केली पाहिजे.इराणचे टॉप लिएंडर व कमांडर मारल्या गेले तरीही इराण थोडासाही डगमगला नाही हा इराणचा प्लस पॉइंट आहे.माझ्यामते अमेरिकेने हे युद्ध ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा इराण अमेरिकेला अनेक गंभीर जखमा देऊ शकतो.हे युद्ध थांबविण्यासाठी जगाने अमेरिका -इस्त्रायलवर दबाव टाकला पाहिजे.कारण या युध्दाचे समर्थन नाटोसह जगातील कोणीही करायला तयार नाही.

इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्ध दिवसेंदिवस अक्राळिवक्राळ रूप घेत आहे आणि याचा परिणाम पुढे चालून महाभयानक होण्याची दाट शक्यता आहे. कारण अमेरिका-इजरायलने इराणला घायाळ करून अनेक जखमा दिल्या आहेत. त्यामुळे इराणकडून युद्ध थांबने शक्य नाही याकरिता हे युद्ध अमेरिकाच थांबवू शकतो अन्यथा याचा गंभीर परिणाम अमेरिका-इस्त्रायलसह मिडलिस्ट व संपूर्ण जगाला भोगावा लागेल. कारण अमेरिकन जनतेकडुन युद्धाचा कडाडून विरोध होत आहे याचाच अर्थ असा की, अमेरिकन जनता डोनाल्ड ट्रम्प यांच्या युध्दाच्या कारवाईच्या विरोधात असल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या एक महिन्याच्या काळात युध्दामध्ये मृतांची सरकारी आकडेवारी हजारोंच्या संख्येने सांगितली जात असली तरी लाखोंच्या संख्येने मानवीय हाणी झाली आहे व अरबो-खरबो रूपयांची वित्तीय हाणी झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत घातक क्षेपणास्त्रे,ड्रोन आणि विध्वंसक शत्रसामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे हे सर्व विनाशकारीचे लक्षणं आहेत. पश्चिम आशियात जनुकाय क्षेपणास्त्र-ड्रोनचा पाऊस पडत आहे की काय असे सुरू आहे.ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका-युरोपमध्ये ३३०० ठिकाणी डोनाल्ड ट्रम्पच्या विरोधात म ोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहे आणि याचे पडसाद जगभर उमटायला सुरुवात झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प विरोधी आंदोलन फक्त अमेरिकेपुरते सिमित रहाले नसुन याचे पडसाद जगातील अनेक देशात पसरले आहे.कारण या युध्दाचा परिणाम बेरोजगारी व महागाईच्या रूपात जगातील प्रत्येक व्यक्तीवर पडत आहे. त्यामुळे सावधान ट्रम्प आतातरी युद्ध थांबवा अन्यथा जगाचा विनाश अटळ आहे.

या युध्दात नाटोसह अनेक मित्र देशांनी डोनाल्ड ट्रम्पला मोठा धक्का दिला असून ठेंगा दाखवला आहे हीच डोनाल्ड ट्रम्पची मोठी हार आहे. अमेरिकेची दादागिरी लक्षात घेता सर्वच देशांनी इराणच्या बाजूने उभे रहायला हवे व शांततेने तोडगा काढायला हवा. अमेरिकेने इराणच्या अणू कार्यक्रमाच्या निगडित ठिकाणावर हल्ला केल्याने युद्ध आणखी चिघळले आहे. यामुळे इराणने अमेरिकी तेल कंपन्यांना टार्गेट करण्याची धमकी दिली आहे.यामुळे तेलाचे दर आभाळाला टेकण्याची दाट शक्यता आहे.अमेरिकेला मित्र देशांचे मोठे झटके पडत आहे अमेरिकेचे मित्र देश फ्रान्स, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंडने अमेरिकी सैन्य विमानांना आपले एअर बेस वापरण्यास नकार दिल्याने ट्रम्प एकाकी पडले आहेत आणि हा अमेरिकेसाठी मोठा झटका आहे. अमेरिकेला मित्र देशांकडून होर्मुझ सामुद्रधुनी संदर्भात मदत न मिळत असल्याने ट्रम्प तिलमिला झाले आहे आणि त्यांनी मित्र देशांना आपली नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की,'जा आणि स्वतः तेल मिळवा.'कारण आमच्याकडे भरपूर तेल आहे. अमेरिकेने इराणच्या महत्वपूर्ण ठिकाणांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अमेरिकन कंपन्यांना लक्ष करण्यात येईल असा इशारा इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड'ने (आयआरजी सी) दिला आहे.यात मायक्रोसॉफ्ट, गुगल, ॲपल, इंटेल, आयबीएम, टेस्ला, आणि बोइंगसह १८ कंपन्यांचा यात समावेश असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे. यावरून स्पष्ट होते की, अमेरिका इराणला जेवढे जखमा देईल त्यापेक्षा जास्त घाव आयआरजीसी अमेरिका व इस्रायलला देईल ही बाब स्पष्ट झाली आहे.त्यामुळे अमेरिकेने युध्दाला सुरुवात केली आणि आता त्यामुळे हे विनाशकारी युद्ध अमेरिकेनेच स्वतःच थांबविले पाहिजे.

– रमेश कृष्णराव लांजेवार


# गुडफ्रायडे म्हणजे, प्रभू येशूचा बलिदान दिवस!

**प्रभू** येशू ख्रिस्त गुरूवारी रात्री आपल्या शिष्यांबरोबर शेवटचे जेवण (लास्ट सपर) करत होते. त्यावेळी ते असे म्हणाले की, 'या ठिकाणी आपल्याबरोबर जेवत असलेली एक व्यक्ती माझ्याशी विश्वासघात करून मला माझ्या शत्रूच्या स्वाधीन करेल. मला माणसांच्या उद्धारासाठी बलिदान द्यावेच लागेल, पण त्या माणसाबद्दल मला वाईट वाटते. हे ऐकून स्कारयोती खोलीच्या बाहेर गेला आणि थेट येशूला पकडण्याचे षडयंत्र रचणार्यांना जाऊन मि ळाला. अवघ्या ३० चांदीच्या नाण्यांच्या मोबदल्यात त्याने हे कृत्य केले. येशूंना पकडण्यासाठी 'गेतशम नी' बागेकडे तो सैनिकांना घेऊन गेला.

शुक्रवारच्या पाहिल्या प्रहरात पहारेकऱ्यांच्या जोड्यांचा आवाज व हत्यारांचा खडखडाट ऐकू येत होता. त्याच वेळी 'स्कारयोतीने काही रोमन शिपायांसमवेत व पहारेकऱ्यांना बरोबर घेऊन त्या 'गतेशमनी' बागेत प्रवेश केला. ते पाहून प्रभू येशूचे शिष्य घाबरले व 'पॅट्रीक' नावाच्या शिष्याने तलवार काढली. त्यावर येशूने त्याला तलवार म्यान्यात ठेवण्यास सांगितले. ते म्हणाले, जे वार करतात तेच घातही करतात.' त्यावर स्कारयोती पुढे आला व त्याने येशूचे चुंबन घेतले. हे चुंबन विश्वासघाताचे होते. शिपाई येशूला घेऊन बंदी बनवून मुख्य पुरोहिताकडे गेले. तेथे त्यांच्यावर महाभियोगाचा खटला चालवण्यात आला. धर्मसभेत प्रभू येशूंवर तीन दोष ठेवले.

१. ही व्यक्ती देवाचा अनादर करते.

२. हे जेरुसलेमचे लोकांनी बांधलेले मंदिर पाडा



मी ते पुन्हा बांधीन, असे तो म्हणतो.

३. हा स्वत:ला देवाचा पुत्र मानतो. हा सर्वात गंभीर आरोप होता

त्यावर महागुरूने त्यांना (येशूंना) विचारले, 'हे खरे आहे का?' त्यावर येशूने 'हो' असे उत्तर दिले. ते ऐकून महागुरूंनी आपले कपडे फाडले आणि सांगितले – आता कोणत्याही आरोपांची गरज नाही. मृत्यूदंड हीच या अपराधासाठी योग्य शिक्षा आहे. सकाळ होताच येशूला रोमन राज्यपाल पाँटीयस पायलेटपुढे आणण्यात आले.

आरोपांचा विषय धार्मिकतेतून राजकीय पातळीवर बदलला. हा आपल्या प्रजेला कर देण्याविरुद्ध भडकवतो, स्वत:ला ख्रिश्चनांचा राजा मानतो व विद्रोह करतो त्यावर पायलेटने त्यांना, 'तुला स्वत:च्या अपराधांविषयी काही सांगावयाचे आहे काय? असे विचारले. त्यावर येशू उद्गारले, 'मी नेहमी सत्याचाच प्रचार करतो.' पायलेटला कळले की ही व्यक्ती निर्दोष आहे त्यावर काइफ व त्याचे साथीदार ओरडून सांगू लागले की, 'सिझर शिवाय आमचा कोणी राजा नाही याला मृत्युदंड देण्यात यावा. पालटेने प्रभू येशूला वाचवण्याचे फार प्रयत्न केले. शेवटी त्याने मोठ्या जनसमुदायासमोर हा प्रश्न नेला. तत्कालीन कायद्यानुसार पवित्र सणाच्या दिवशी एका कैद्याला सोडण्यात येईल, असा नियम होता. त्यावेळी तुरूंगात खूनाच्या आरोपाखाली कैदेत असलेला बरबा नावाचा एक डाकूही होता. पायलेटने लोकांना थेट विचारले, की कुणाला सोडायचे बरबाला की येशूला? त्यावर तत्कालीन धर्ममार्तंडाच्या प्रभावाखाली असलेल्या जनसमुदायाने बरबाला सोडून द्यावे असे ओरडून सांगितले. आणि येशूला सूळावर चढविण्याची शिक्षा करण्यास सांगितले. आता पायलेटचा नाईलाज झाला. रोमन सम्राट सीझरला आपल्याविषयी कुणी तक्रार करू नये वा येशूच्या मृत्यूचे बालंट आपल्या अंगावर येऊ नये म्हणून तो खुर्चीवरून उठला आणि त्याने हात धुतले व सांगितले, की मी ह्याला निर्दोष मानतो. याच्या मृत्यूचा दोष तुमच्या माथ्यावर आहे आणि त्याने येशूला मृत्युदंड देर्णायांच्या स्वाधीन केले. आरोप ठेवला दंगली भडकावण्याचा. शिपायांनी प्रभू येशूच्या डोक्यावर काटेरी मुकुट ठेवला व त्याची टर उडवत त्याला म्हणाले की, 'हे ज्यू राजा तुला प्रणाम' आणि त्याच्या खांद्यावर लाकडाचे दोन जड बांबू ठेवून त्याला फटके देत 'सॅन्तोनियो' किल्लृयाच्या टोकावर घेऊन गेले. येशूचा अनन्वित छळ करण्यात आला. त्याच्या हातपायावर खिळे ठोकण्यात आले. डोक्यावर काटेरी मुकुट ठेवला. कुणी त्याच्या गालात थापडा मारल्या, कोणी त्यांच्या तोंडावर थुंकले. मानेवरचे जू खाली पडले की रोमन शिपाई त्यांना आसुडाचे फटके देत. एवढे करूनही येशूच्या मनी त्यांच्याविषयी क्षमाभावनाच होती. 'हे प्रभू यांना क्षमा कर हे काय करताहेत हे त्यांना कळत नाही.' असे म्हणून त्यांनी छळ करर्णायांना क्षमा करण्याची विनंती इश्वराजवळ केली. प्रभू येशूला सुळावर चढविल्यानंतर येशूने परमेश्वराला विचारले, 'हे परमपिता तुम्ही माझा का त्याग केलात?' त्या वर परमपित्याने (परमेश्वराने) तिसऱ्या दिवशी त्यांना परत जिवंत केले. आता दुपारचे दोन वाजले होते. माणसांना पापमुक्त करायचे काम येशूच्या बलिदानाने पूर्ण झाले होते. येशूने मोठ्या आवाजात पूर्ण झाले.' असे म्हणत डोके खाली झुकवून आपले प्राण परमात्म्यात विलीन केले व परमात्म्याला, 'माझा आत्मा मी तुझ्या हाती सोपवतो. असे म्हणताच मोठ्या मंदिराचा पडदा फाटला, सूर्याचा प्रकाश विरला, भूकंप झाले आणि प्राणार्पण केले. ही जयघोषाची वाणी ऐकून सैतान, मृत्यू, पाप पराजित झाले. आता जो त्यावर विश्वास ठेवेल तो उद्धवस्त न होता अनंत जीवन प्राप्त करेल. कारण या शुक्रवारी प्रभू येशूच्या बलिदानाने माणसाच्या मुक्तीची योजना पूर्ण झाली. म्हणून त्या दिवसाला 'गुड फ्रायडे' म्हणतात.

# भाजपाची 'सीख' विरुद्ध ममतांची 'चीख'

**स्वर्गीय** अटल बिहारी वाजपायी यांनी एकदा भाजपच्या निवडणुकातील यशाचे रहस्य एका वाक्यात सांगितले होते. ते म्हणाले होते की भाजपा ना चुनाव जितती है ना हारती है बल्की वह हर चुनावसे कुछ 'सीखती' जरूर है.

अटलजी यांनी मळलेल्या पाऊलवाटांचे राजमार्गात रूपांतर करताना मोदी शाह यांना अटलजींच्या वरील मूलमंत्राचा अजिबात विसर पडलेला नाही हे गेल्या काही वर्षात भाजपने जिंकलेल्या तसेच हरलेल्या निवडणुकातून स्पष्ट होते.

आता येत्या महिन्यात भारतात चार राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुका होत आहेत.या निवडणुकांचे वैशिष्ट्य म्हणजे एक आसाम सोडले तर बाकीच्या बंगाल, केरळ आणि तामिळ नाडू या राज्यात विरोधी 'इंडी' आघाडीतील घटक पक्षांची सरकारे आहेत. पोंडिचरीत एन.डी. ए.चे म्हणजेच भाजपचा मित्र पक्ष अण्णा द्रमुक चे सरकार आहे. आसाममध्ये भाजपचे सरकार आहे. म्हणजेच या निवडणुकीत भाजपापेक्षा 'इंडी' आघाडीची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. त्यांच्यासाठी ही अग्निपरीक्षा ठरण्याची चिन्हे आहेत. पण या निवडणुकातील यशापयशाचे मूल्यमापन मात्र भाजपच्या संदर्भात अधिक होणार आहे ही गोष्ट भाजपचे भारतीय राजकारणातील मध्यवर्ती स्थान अधोरेखित करायला पुरेशी आहे.

पाच राज्यापैकी ज्याला 'बॅटल रॉयल' म्हणता येईल अशी लढत पश्चिम बंगालमध्ये होणार आहे म्हणून त्या राज्याचा उहापोह प्रथम करू या. पश्चिम बंगालमध्ये २०११पासून ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचे एकछत्री, एकतंत्री आणि एकपात्री राज्य आहे. मार्क्सवाद्यांची सलग ३५ वर्षाची राजवट उल्थवून सत्तेत आलेल्या ममता बॅनर्जी यांनी डाव्या आघाडीला बंगालमधून शब्दशः हद्दपार केले आहे. या सर्व घडामोडीत भाजप चित्राच्या चौकटीत सुद्धा नव्हता. पण २०२६ च्या निवडणुकीत मात्र भाजप बंगाल मध्ये सत्तेचा दावेदार म्हणून उदयाला आला आहे हीच गोष्ट 'अटलजींच्या' वाणीची साक्ष पटवून देणारी आहे. २०१६ च्या निवडणुकीत भाजपचे फक्त ३ आमदार निवडून आले होते. २०२१च्या निवडणुकीत भाजपने ७७ जागा जिंकताना वोट शेअर मध्ये १०% वरून ३८ % पर्यंत उडी मारली. ही छलांग ममताच्या मनात धडकी भरवणारी होती. या निवडणुकीत ५६ जागा भाजप फार थोड्या मतांच्या फरकाने हरला होता. २०२१ मध्ये बंगाल मध्ये भाजपची लाट निर्माण जरुर झाली होती पण तिलाच 'त्सुनामी' समजून भाजपने '२००+' चा नारा दिला व त्यात त्याची फसगत झाली.

२०२६ च्या निवडणुकीला सामोरे जाताना भाजपने २०२१ मध्ये झालेल्या/ केलेल्या चुका टाळण्याचा प्रयत्न केला आहे. या निवडणुकीत भाजप वैयक्तिकरित्या ममतादीदींना लक्ष्य करत नाहीये. त्याऐवजी तृणमूल काँग्रेसच्या सरकारविरुद्ध आरोपपत्र सादर करताना भाजपने ममताच्या कुशासनाविरुद्ध दंड थोपटून ममताच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. एक प्रकारे भाजपने अजेन्डा /नॅरेटिव्ह सेट करून ममताना बॅक फूट वर ढकलले आहे.जनतेला दैनंदिन जीवनात भेडसावणारे भ्रष्टाचार, टी. एम. सी. ची गुंडगिरी, राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, महिलांवरील अत्याचार, कट मनी, मुसलमानांचे तुष्टीकरण, घुसखोरांना दिले जात असलेले संरक्षण / उत्तेजन, राज्यात नवीन उद्योग धंदे न येणे व त्यातून बेरोजगारीने धारण केले उग्र स्वरूप आदी विषय भाजपने ऐरणीवर आणले आहेत.या मुद्द्याना ममता उत्तर देऊ शकत नाही म्हणून 'बंगाली विरुद्ध गुजराती', बंगाली लोकांविरुद्ध पक्षपात , बंगाली भाषेवरील तथाकथित अन्याय वगैरे भावनिक मुद्दे पुढे करून ममता प्रादेशिक अस्मितेला सेन्टर स्टेज वर आणण्याचा प्रयत्न करत आहे.

कोलकत्त्यातील बी.जी. कार हॉस्पिटलमध्ये एका डॉक्टर महिलेवर झालेला बलात्कार व तिच्या हत्येमुळे ममताचा भरवशाचा मतदार असलेला 'भद्र' समाज मुळापासून हादरला आहे. हा समाज यावेळी ममताच्या पाठीमागे कितपत उभा राहील याची शंका आहे.संदेशाखाली मध्ये आदिवासी महिलांवर ममताच्या नेत्यांनी केलेल्या अत्याचाराचे प्रकारणही जनता विसरलेली नाही. राज्यातील हिंदू समाज भाजपमागे एकवटताना दिसत आहे. जाळीदार टोपी घातलेल्या लोकांना हेल्मेट घातले नाही म्हणून पोलीस दंड ठोठवत नाहीत पण हिंदूंच्या नावाने मात्र लगेच चलन फाडले जाते हा पक्षपात लपून राहिलेला नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे 'स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन' केल्याने जवळजवळ एक कोटी मृत /मायग्रंट / फर्जी /घुसखोर बांगला देशी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत याचा जबर फटका तृणमूल काँग्रेसला बसणार आहे हे नक्की. याबाबत एक उदाहरण पुरेसे बोलके आहे. एका मतदाराच्या वडिलांच्या नावाने मतदान झालेले आढळल्यावर त्याने चौकशी केली तेव्हा त्याला टी. एम. सी. च्या लोकांनी सांगितले की त्याचे वडील अर्धा तासापूर्वी मतदान करून गेले. प्रत्यक्षात त्याच्या वडिलांचा चार वर्षांपूर्वीच मृत्यू झाला होता.

बंगालबाबत रोज नवीन सर्वेक्षणे येत आहेत. सर्व तज्ज्ञ मंडळी २०२१च्या निवडणुकीत तोंडावर आपटल्याने आता सर्व जण ममताच परत सत्तेवर येईल असा 'सेफ गेम ' खेळत आहेत. त्यातील 'सी वोटर 'चे फसलेले अंदाज आणि राहुल गांधींनी हरलेल्या निवडणुका यांची संख्या एकसारखीच आहे त्यामुळे यशवंत देशमुख च्या 'वोट ट्रॅकर ' कडे मुळीच लक्ष देऊ नये. या महाशयानी महाराष्ट्रात, हरियाणात सत्ता बदल होईल असे आपल्या 'वोट ट्रॅकर द्वारे छातीठोकपणे सांगितले होते. त्यातल्या त्यात प्रदीप गुप्ता यांच्या 'मार्टिज ' संस्थेचे सर्वेक्षण विश्वासार्ह वाटते. झारखंड मध्ये सर्व पोलस्टार्स भाजपला विजयी करून मोकळे झाले होते त्यावेळी एकट्या प्रदीप गुप्ताने झारखंड मुक्ती मोर्चा पुन्हा सत्तेत येईल असे भाकित केले होते आणि त्याने अंदाज केल्यानुसारच दोन्ही पक्षांना जागा मिळाल्या होत्या. (प्रदीप गुप्ताचा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशाबबतचा अंदाज चुकला होता, हा अपवाद ).

एकूणच बंगालची निवडणूक रोमांचकारी होत असून ममतासाठी ही लढत 'डू ऑर डाय ' अशी आहे तर भाजपसाठी 'अभी नही तो कभी नही ' अशा स्वरूपाची आहे. भाजपची 'सीख' विरुद्ध ममताची 'चीख' अशी ही लढत होत आहे. माझ्या मते भाजप बंगालमध्ये चमत्कार घडवेल.

**– रघुनंदन भागवत**

# ग्रामदैवत श्री. खंडोबा महाराज यात्रेनिमित्त वैजापूरात विविध कार्यक्रम



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) – वैजापूचे आराध्य दैवत श्री खंडोबा महाराज यात्रेनिमित्त गुरुवार(ता,०२) रोजी खंडोबा मंदिरापासून मूर्तीची पालखी मिरवणूक रथातून काढण्यात आली. शहराच्या विविध मार्गावरून ही मिरवणूक नेऊन ग्रामवासीयांना

खंडोबा मूर्तीचे दर्शन घडविण्यात आले.या मिरवणुकी

त चंद्रकांत निकम, शंकर मुळे, सचिन महाजन,रामेश्वर भगत, अशोक जावडे,अशोक जेजुरकर, हरिभाऊ जोरे,प्रवीण वाणी, बजरंग मगर,दीपक साळुंके, प्रकाश बोथरा,शिवलिंग आप्पा साखरे, जेष्ठ नागरिक धोंडिरामसिंह राजपूत, प्रकाश बोथरा, विनोद गायकवाड यांनीही सहभाग नोंदविला. तसेच गणेश खंडागळे, राजू महाजन,विजय महाजन,प्रवीण चव्हाण

ललित गावडे, गोरख गावडे, गणेश महाजन कमलेश आंबेकर,लोखंडे पाटील,शुभम निकम ,विश्वनाथ निकम, सोन्याबापू गावडे, यांनी सहकार्य केले.या उत्सवात बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम ही सम्पन्न झाला.आकर्षक शोभेची दारू ही सोडण्यात आली. तसेच श्री शिवशक्ती वाघे मंडळी यांचा जागरण गोंधळ कार्यक्रम ही घेण्यात आला,त्यानंतर उपस्थित भक्त –भाविकाना महाप्रसाद ही वाटप करण्यात आल. .शेवटी चंद्रकांत निकम व शिवलिंग साखरे यांनी आभार मानले.

# वैजापूरात विविध हनुमान मंदिरात श्री. हनुमान जन्मोत्सव विविध कार्यक्रमानी उत्साहात संपन्न



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) – येथील ग्रामदैवत श्री. संकट मोचन हनुमान मंदिरात गुरुवार(ता.०२) रोजी सकाळी ६-१५ वाजता हनुमान मूर्ती समोरील पडदा बाजूला झाला व उपस्थितांनी एकच जय घोष केला,',रामभक्त हनुमान की जय'बजरंग बली की जय', संकट मोचक हनुमान जी की जय', सियावर रामचंद्रकी जय'आणि फटाक्यांची आतषबाजी झाली व श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. सर्व उपस्थित भक्त भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी व त्यांच्या परिवार मार्फत सर्व विधी पूर्ण करण्यात आले. पहाटे पांच वाजल्यापासून भजनी मंडळ सदस्यांनी विणेकरी बाबासाहेब गायकवाड यांच्या समवेत धार्मिक गीते, भक्ती गीते मंदिरात सादर केली.या प्रसंगी विश्वत समिती अध्यक्ष प्रशांत कंगले यांनी सर्व भजनी मंडळींना उपरणे टाकून त्यांचे स्वागत केले.या प्रसंगी विश्वस्त केशव आंबेकर, कैलास साखरे, विनोद गायकवाड, काशिनाथ भावसार, पंकज साळुंके, ऑडीटर अरुण भालेकर, जेष्ठ नागरिक धोंडिरामसिंह राजपूत, अशोक पवार खंडाळकर, शरद मोहरीर, माजी नगरसेवक डॉ. निलेश भाटिया, रमेश पाटील हाडोळे, ज्ञानेश्वर टेके, बाबासाहेब धुमाळ, मुकुंद व गोविंद शेठ दाभाडे, सुधीर लालसरे, गिरीश भालेराव, दिनेश ढाकरे, सुमनबाई गायकवाड, शीतल राजपूत, जिजाबाई गायकवाड यांच्या सह भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजपूत समाज मढी येथे आदल्या दिवशी भजन संध्या कार्यक्रम झाला तर हनुमान जन्मोत्सव दिनी पूजा, आरती व महाप्रसाद वाटप, काटे मारोती मंदिर व ब्रम्हचारी मंदिर येथेही महाप्रसाद वाटप झाले.

पाटील गल्ली येथील मारोती मंदिरात पोलीस पाटील गुलाबराव साळुंके यांच्या उपस्थितीत आरती व महाप्रसाद वाटप झाले.

उत्तमराव साळुंके, मधुकर साळुंके, घन:श्याम वाणी, बापू गावडे, उल्हास साळुंके, राजेंद्र साळुंके यांची उपस्थिती होती. बजरंग चौक मारोती मंदिरात माजी नगरसेवक रामदास टेके, श्रावण चौधरी, काशिनाथ आगाज, ज्ञानेश्वर टेके यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. शहरातील ईतर भागातिल मंदिरात ही हनुमान जन्मोत्सव उत्साहात पार पडले.

# रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर व क्युरीया इंडिया प्रा.लि.तर्फे महिला दिनानिमित्त विविध १३ शाळांना सॅनिटरी पॅड वेंडिंग व इन्सिनरेटर मशीनचे लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर, दि.२ (प्रतिनिधी) – जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर व क्युरीया इंडिया तर्फे १३ विविध शाळेच्या विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व सॅनिटरी पॅड इन्सिनरेटर मशीनचे लोकार्पण करण्यात आले.

मनपा प्रशाला प्रियदर्शिनी मयूरबन कॉलनी, मनपा प्रशाला छत्रपती ७ सिडको, मनपा प्रशाला मुकुंदवाडी, अनंत भालेराव विद्या मंदिर चेतना नगर, मोनटेसरी बालक मंदिर सरस्वती कॉलनी, कर्मवीर शंकरसिंग नाईक हायस्कूल, अमनविश्व हायस्कूल, वंदे मातरम माध्यमिक विद्यालय, पुंडलीक नगर, जि. प. उच्च माध्यमिक शाळा, गाडीवाट, स्वामी विवेकानंद विद्यालय चित्ते पिंपळगाव, स्वामी ब्रह्मानंद महाराज माध्यमिक विद्यालय पिंपरी, मिलिंद मलटी परपज हायस्कूल नागसेनवन, जुननेश्वर स्कूल, वरुड या तेरा शाळांना याचा लाभ झाला.




या उपक्रमामुळे मुलींना आवश्यकतेच्या वेळी सॅनिटरी नॅपकिन सहज उपलब्ध होणार असून, त्याचबरोबर वापरलेल्या नॅपकिन्सची स्वच्छ व सुरक्षित विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे. वेंडिंग मशीनमुळे गोपनीयता राखून त्वरित नॅपकिन उपलब्ध होतात, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

स्थापित करण्यात आलेल्या इन्सिनरेटरमुळे वापरलेल्या नॅपकिन्सची सुरक्षितरीत्या विल्हेवाट लावता येणार असून, त्यामुळे पर्यावरण प्रदूषण टाळण्यास तसेच परिसर स्वच्छ राखण्यास मदत होणार आहे. चुकीच्या पद्धतीने नॅपकिन्स टाकल्यामुळे होणारे संसर्गाचे धोकेही यामुळे कमी होणार आहेत.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. अनय फणसळकर यांनी मुलींचे सक्षमीकरण या फोकस एरिया अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात आल्याची माहिती दिली. प्रकल्प प्रमुख रो सूरज डुमणे तसेच माजी अध्यक्ष रो अमित वैद्य यांनी विद्यार्थिनींना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगत आरोग्यदायी सवयी अंगीकारण्यावर भर दिला. सर्व शाळांच्या मुख्याध्यापक व महिला शिक्षिका तसेच विद्यार्थिनींनी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व सॅनिटरी पॅड इन्सिनरेटर मशीन शाळेस अत्यंत आवश्यक असून ते दिल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर चे आभार व्यक्त केले. हा प्रकल्प क्युरीया इंडिया कंपनीच्या सी एस आर फंडातून राबवण्यात आला आणि त्यासाठी कंपनीचे डायरेक्टर तसेच क्लबचे सदस्य रो. डॉ मनोज डोर्लीकर यांनी केलेल्या अथक प्रयत्ना मुळे यशस्वी झाला. कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्ष रो अनय फणसळकर, सचिव रो मुकुंद पागे, प्रकल्प प्रमुख रो सूरज डुमणे, रो सुनील बागुल, रो सतीश लोणीकर, रो अमित वैद्य आणि इतर रोटरी सदस्य आदी उपस्थित होते.

# सैन्यदल, नौदल, वायुदल भरतीपूर्व नि:शूल्क प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – – भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी नि:शूल्क प्रशिक्षण दिले जाते. छात्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे दि.४ ते १३ मे या कालावधीत प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीनी दि.३ मे रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर राहावे. प्रशिक्षणार्थीना निशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दि.२ मे रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी Department of Sainik Welfare,Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील डडइ- ६५ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेश पत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन घ्यावे.

पात्रता:- कम्बाईन्ड डिफफेन्स सर्व्हिसेस परीक्षेसाठी अथवा नॅशनल डिफफेन्स ॲकेडमी परीक्षा उत्तीर्ण व सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी स्पेशल एन्ट्रीसाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. टेक्निकल ग्रॅज्युएट्साठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.विद्यापीठ प्रवेश प्रणालीस्ठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई मेल आय डी : training.{ctcnashik@gmail.com दूरध्वनी क्र. आणि ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसप क्र . ९१५६०७३३०६ (प्रवेश पत्र मिळिवण्यासाठी ) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# ६ डिसेंबर १९९२ आणि ५ ऑगस्ट २०20 हे दोन ऐतिहासिक दिवस- राजीव जहागीरदार

## सारा परिवर्तन हर्सूल सावंगी येथे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२ (प्रतिनिधी) – १५२८ मध्ये बाबराचा सेनापती मिरबाकिने श्रीराम मंदिर उद्धवस्त करून त्या ठिकाणी बाबरी ढाचा उभा केला. ४६४ वर्षांनी ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी ढाच्याचा पतनाने भारतीय संस्कृती वरील कलंक विराट हिंदू शक्तीने नेस्तनाबूत केला आणि ५ ऑगस्ट २०२० रोजी मुक्त झालेल्या राम जन्मभूमीवर सार्वभौम स्वतंत्र भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रभाई मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूजनिय सरसंघ चालक डॉक्टर मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत भव्य श्रीराम मंदिर निर्माणाचे भूमिपूजन झाले आणि आज तेथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भव्य श्रीराम मंदिर उभे आहे असे प्रतिपादन श्री राजीव जहागीरदार यांनी केले.




ते हर्सूल सावंगी येथील सारा परिवर्तन या सोसायटीत दिनांक २९ मार्च २०२६ रोजी संपन्न झालेल्या हिंदू संमेलनात बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून पिठाधीश महंत ह.भ. प. स्वामी विशुद्धानंद तीर्थ आणि अध्यक्ष म्हणून श्री रवींद्र इंगे उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री राजीव जहागीरदार यांनी संघाचा शंभर वर्षाचा इतिहास सांगताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो हा भाग लक्षात ठेवावा आणि त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने आपला संसार आपला व्यवसाय सांभाळून सामाजिक कार्यात सक्रिय होऊन कार्य करावे असे त्यांनी सांगितले.

संघशताब्दी सरसंघचालक पूजनीय मोहनजी भागवत यांनी सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्वबोध आणि नागरिक कर्तव्य या मुद्द्यांवर आगामी काळात संघ काम करेल असे सांगितले त्यामुळे श्री जहागीरदार यांनी वरील पंच परिवर्तनाच्या मुद्द्यांवर सविस्तर प्रकाश टाकला. ते पुढे म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दी वर्षांमध्ये वस्तीनिहाय हिंदू संमेलने घेण्याचे ठरवले आहे यामागे हेतू हा त्या त्या वस्तीतील हिंदू समाजातील सर्वांनी जातीभेद विसरून एकत्र आले पाहिजे आणि येणाऱ्या संकटाचा सामना केला पाहिजे. आज हिंदू समाजावर लव्ह जिहाद,लँड जिहाद, वोट जिहाद, धर्मांतर अशा अनेक संकटे आहेत. संमेलनाचे प्रमुख अतिथी महंत श्री विशुद्धानंद तीर्थ यांनी आपले विचार व्यक्त केले. संमेलनाच्या सुरुवातीला श्री. अजिंक्य लिंगायत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी छत्रपती शिवरायांचे पोवाडे गाऊन संमेलन स्थानी चैतन्य निर्माण केले. आणि तरुण-तरुणीनी शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रात्यक्षिके सादर केले. संमेलनाचे सूत्रसंचालन कुमारी स्नेहल दहिभाते व विशाल दंडे यांनी केले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी श्री. विशाल दंडे श्री अभिजीत देशमुख श्री अमित दहिभाते श्री गणेश क्षीरसागर श्री सुजित रत्नपारखी श्री विजय दहिभाते श्री राहुल जोशी श्री गणेश देवडे श्री स्वप्नील पुराणिक श्री किरण भालेराव यांनी मेहनत घेतली. संमेलनाला विश्व हिंदू परिषद मंदिर आयामाचे श्री शिवाजी दहिवाल प्रदीप देशमुख श्री अजिनाथ धामणे सौ राणी सोनवणे श्री संजय तरटे सह मोठ्या संख्येत नागरिक बंधू भगिनी उपस्थित होते.

# महावीर ठोले यांना आचार्य शांतिसागरजी पुरस्कार जाहीर

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – खतौली (उत्तर प्रदेश) येथील संयम भारती परिवारतर्फे आयोजित १५ वी राष्ट्रीय निबंध स्पर्धा २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थ संरक्षिणी महासभा महाराष्ट्र प्रांत चे महामंत्री, छत्रपती संभाजीनगर येथील महावीर दीपचंद ठोले यांना 'चारित्र चक्रवर्ती आचार्य शांतिसागरजी महाराज प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे.



आचार्य अभिनंदनजी महाराज यांच्या सुशिष्या गणिनी आर्यिका रत्न श्री सुभूषणमति माताजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आ. अनेकांत सागरजी यांच्या प्रेरणेने ही स्पर्धा पार पडली. देशभरातून एकूण ८४१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. युद्ध व दहशतवादावर नियंत्रणासाठी अहिंसेची आवश्यकता हा स्पर्धेचा विषय होता.

या स्पर्धेत द्वितीय पुरस्कार दीक्षिता डबकर (बांसवाडा, राजस्थान) यांना, तर तृतीय पुरस्कार संजय जैन (नवी दिल्ली) यांना प्रदान करण्यात आला. परीक्षक म्हणून सौ. चंद्रकला शाह (इडर, गुजरात) यांनी कार्य पाहिले. पुरस्कार वितरण समारंभ गणिनी आर्यिका सुभूषणमति माताजी यांच्या ४२ व्या दीक्षा दिनानिमित्त उदयपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

महावीर ठोले यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. ही माहिती नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# महासाधना सप्ताह; सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी 'कर्मयोगी' प्रशिक्षण पूर्ण करावे-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या महा साधना सप्ताह या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी सहभागी व्हावे व प्रशिक्षण पूर्ण करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.



भारत सरकार क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ८ या दरम्यान 'साधना सप्ताह' राबविण्यात येणार आहे. राज्य शासनातील अधिकारी- कर्मचारी यांना ६ उदू कर्मयोगी या प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आज एका प्रशिक्षण कार्यशाळेद्वारे करण्यात आली. स्मार्ट सिटी सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. या कार्यशाळेस सर्व विभागप्रमुख, कार्यालयप्रमुखांनी तसेच क्षेत्रीय व तालुकास्तरीय अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

माहिती व तंत्रज्ञान कक्षाचे समन्वयक शरद दिवेकर यांनी महा साधना सप्ताह, तसेच ग-उदू प्रणाली नोंदणी व पूर्ण करावयाचे अभ्यासक्रम याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले.

राज्य शासनाने हा उपक्रम 'महासाधना' उपक्रम म्हणून राबविण्याचे ठरविले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलत्या काळातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न होत आहे. या उपक्रमांतर्गत विविध सादरीकरणे, मार्गदर्शन सत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, ई-गव्हर्नन्स प्रणाली, प्रभावी संवाद कौशल्य, तसेच कार्यालयीन कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. बदल त्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांना अद्ययावत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करता यावीत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यात सर्व विभागांचे व सर्व वर्गातील मिळून २६ हजार ७९७ अधिकारी- कर्मचारी कार्यरत आहेत. हे सर्व अधिकारी कर्मचारी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होतील.

प्रशासनातील कामकाज अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होणार आहे. तसेच नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरेल,असे मत जिल्हाधिकारी स्वामी यांनी व्यक्त केले.शासनाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षणाने अद्यावत करणाऱ्या या उपक्रमात सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी सहभागी होऊन नेमून दिलेल्या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## महानगर प्रदेशातील गावांचे जीआईएस प्रणालीद्वारे सर्वेक्षणासाठी संबंधितांनी अचुक डाटा उपलब्ध करून द्यावा-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर विकास प्राधिकरणामार्फत महानगर प्रदेशातील गावांचा भविष्यातील परिपूर्ण विकासासाठी, पायाभुत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करून त्यांच्यामाध्यमातून जीआईएस प्रणालीद्वारे सर्वेक्षण सुरू आहे. यासाठी संबंधित सर्व विभागांनी आवश्यक तो अचूक डाटा उपलब्ध करून देण्याचे निर्देश महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात अहवालाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर तसेच नियोजन विभागासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशातील छत्रपती संभाजनगर जिल्हयातील छत्रपती संभाजीनगर, फुलंब्री, गंगापूर, पैठण, खुलताबाद या पाच तालुक्यातील एकूण ३११ गावांमधील भौतिक, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचे निश्चित मानकांनुसार सखोल विश्लेषण करून जीआईएस प्रणालीच्या माध्यमातून सद्यस्थितीदर्शक नकाशे व सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी पी. एन. शिधोरे सिव्हिल इंजिनिअर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेव्दारे प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात प्राधिकरण हद्दीतील मौजे सहजापूर, बाळापूर, शेंद्रा जहांगीर, कागजीपुरा व फारोळा या पाच गावांचा पथदर्शी स्वरूपात अभ्यास करण्यात आला असून त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आला आहे. तर उर्वरित ३०६ गावांचे सर्वेक्षण पुढील टप्प्यात करण्यात येणार आहे.

यासाठी सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच आस्थापनांकडून आवश्यक माहिती संकलित करणार असून आवश्यक त्या ठिकाणी छायाचित्रणासह स्थळपाहणी देखील करण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित सर्व शासकीय कार्यालये, आस्थापना तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी या संस्थेस आवश्यक माहिती तात्काळ उपलब्ध करून दयावेत. तसेच नागरिकांनीही या सर्वेक्षण कार्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य करावे, असे आवाहन महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना-युवकांसाठी सुवर्णसंधी; इच्छुक व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा-प्रशासनाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना ही देशातील युवकांसाठी करिअर घडविण्याची एक महत्त्वपूर्ण संधी ठरत आहे. या योजनेच्या माध्यमातून युवकांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होत आहे.

या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिप दिली जाते. इंटर्नशिप दरम्यान दरमहा रु. ९,००० आर्थिक सहाय्य तसेच सुरुवातीला रु. ६,००० एकरकमी अनुदान दिले जाते.

या योजनेमुळे युवकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, नवीन कौशल्ये विकसित करण्याची संधी, व्यावसायिक नेटवर्क तयार करण्याची संधी तसेच आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकास साधण्यास मोठी मदत होणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षे दरम्यान असणे आवश्यक असून उमेदवार पूर्णवेळ नोकरीत नसणे आवश्यक आहे. सध्या या योजनेचा तिसरा टप्पा सुरू असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर जाऊन त्वरित अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्ह्यातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा. छत्रपती संभाजीनगर विभागातील जास्तीत-जास्त युवकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या करिअरची भक्कम पायाभरणी करावी, असे आवाहन उपआयुक्त विद्या शितोळे यांनी केले आहे.

# क्रीडा, कला स्पर्धेत यश मिळवलेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गौरव

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय कला व क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गौरव मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते गुरुवारी (२ एप्रिल) करण्यात आला.

अखिल भारतीय आंतरविद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने राजस्थानात आयोजित ४७ व्या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सहायक अभियंता रवी मिरगणे यांनी सुवर्णपदक पटकावले. कामगार कल्याण मंडळाच्या नाट्य स्पर्धेत भानुदास शेवाळे यांना नाट्यलेखनाचे प्रथम पारितोषिक मिळाले. तर दिग्दर्शक रमेश शिंदे यांच्या नाटकाला उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक तर श्रावण कोळनूरकर यांना अभिनयासाठी उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक मिळाले. या संघात सपना भोसले, स्वप्नाली परदेशी, शिवाजी नरवडे, अभय एरंडे, सदानंद जाधव, नितीन सूर्यवंशी, अनिल राजपूत, जीवन पवार, सतीश ढवळे यांचा समावेश होता. कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेत संघप्रमुख नवनाथ पवार यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने सांघिक तृतीय पारितोषिक पटकावले. या संघात डॉ.सुधाकर जायभाये, भानुदास शेवाळे, रमेश शिंदे, सदानंद जाधव, अभय एरंडे, वैभव साखरे, अरुण दुबाले, राजेश्वर सूर्यवंशी, दिगंबर रेंगे, लक्ष्मण वाघ, जीवन पवार यांनी सहभाग घेतला. सर्व यशस्वी कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कलावंत व खेळाडूंचे अभिनंदन करताना कछोट म्हणाले की, महावितरणाच्या कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये ते चांगली कामगिरी करून कंपनीचा नावलौकिक वाढवतात. यापुढेही अशा स्पर्धांत महावितरणचे नाव उंचावतील, अशी अपेक्षा




व्यक्त करून त्यासाठी त्यांना सर्वतोपरी साह्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. कर्मचाऱ्यांच्या गौरव समारंभास अधीक्षक अभियंता महेश पवार, बीना सावंत, मनीष ठाकरे, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, उपमुख्य औद्योगिक औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, प्रणाली विश्लेषक राजाराम पाटील, व्यवस्थापक प्रवीण गायकवाड, प्रभारी अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड, सहायक अभियंता अविनाश चव्हाण, विक्रांत खाडे, प्रशांत बनसोडे उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले.

## उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक पदी डॉ. अरविंद हरबडे यांनी पदभार स्वीकारला

वैजापूर दि.३ (प्रतिनिधी)- येथील उपजिल्हा रुग्णालय रिक्त जागी बीड येथून बदलून आलेले डॉ. अरविंद हरबडे यांनी १एप्रिल रोजी वैद्यकीय अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारला .त्यांचे जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडिरामसिंह राजपूत यांनी स्वागत केले असून वैद्यकीय सेवा अधिक चांगल्या प्रकारे देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.या समयी कार्यालयीन कर्मचारी किसन चौधरी तसेच मनोज गायकवाड यांचीही उपस्थिती होती.

### छत्रपती संभाजीनगरात मोठा प्रशासकीय खांदेपालट

# जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त आणि झेडपी सीईओंची एकाच वेळी बदली

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल केले असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या प्रशासनातील तीन प्रमुख अधिकाऱ्यांच्या एकाच वेळी बदल्या केल्या आहेत. यामध्ये जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या तिन्ही महत्त्वाच्या पदांचा समावेश आहे. एकाच वेळी शहराचा गाडा हाकणाऱ्या या तिन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी आता विनय गौडा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून प्रशासकीय सूत्रे हाती घेतील.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त जी. श्रीकांत यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी आता कोल्हापूरचे विद्यमान जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची छत्रपती संभाजीनगरचे नवे मनपा आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर, जी. श्रीकांत यांच्यावर आता नवी मुंबई येथे 'जल जीवन मिशन'च्या संचालक पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांची देखील बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी आता श्रीमती मित्रु पी.एम. यांची नूतन सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# मृदंगाचार्य लघाणे महाराजांच्या पत्नीने संपवलं जीवन; पतीकडून धमक्या, अनैतिक संबंधामुळे विवाहिता त्रस्त

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमध्ये कौटुंबिक छळ, मानसिक त्रास आणि पतीच्या कथित अनैतिक संबंधांमुळे त्रस्त झालेल्या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या रांजणगावमधील शेपू विवाहित महिलेने गळफास घेत आयुष्य संपवलं. पतीच्या अनैतिक संबंधांमुळे आणि सततच्या मानसिक छळामुळे तिने टोकाचा निर्णय घेतल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणी पतीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. तसा गुन्हाही दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

अमोल लघाणे हा कीर्तनामध्ये मृदंग वाजवणारा मृदंगाचार्य म्हणून ओळखला जात होता. कीर्तनामध्ये मृदंग वाजवणाऱ्या पतीचे पत्नीवर होणारे मानसिक छळ आणि अनैतिक संबंध यामुळे जिल्ह्यात या प्रकरणाची चर्चा रंगली आहे. या प्रकरणानंतर पतीच्या सततच्या छळामुळेच काजलने टोकाचा निर्णय घेतला' असा आरोप करत अमोल लघाणे याच्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी विवाहितेच्या कुटुंबीयांनी केली आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील देवपिंपळगाव येथील शेतकरी आण्णासाहेब केशवराव जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची मुलगी काजल हिचे लग्न २५ मार्च २०२५ रोजी रांजणगाव शेनपुंजी येथील मृदुंगाचार्य अमोल बाबासाहेब लघाणे याच्याशी पारंपरिक पद्धतीने झाले होते. अमोल लघाणे हा कीर्तनामध्ये मृदंग वाजवणारा मृदंगाचार्य म्हणून ओळखला जात होता.

लग्नानंतर सुरुवातीला काजलचा संसार सुरळीत सुरू होता. मात्र, काही महिन्यांनंतर अमोल याचे दुसऱ्या महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय निर्माण झाला. या कारणावरून काजल हिला सतत मानसिक त्रास सहन करावा लागत होता. यासोबतच पतीकडून वारंवार धमक्या, शिवीगाळ आणि मारहाण केली जात असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

काजलने ही बाब आपल्या आई-वडिलांना सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी दिवाळीच्या सुमारास अमोल याला समजावण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्याने उद्धट वर्तन करत कोणतीही सुधारणा न दाखवता उलट धमक्या दिल्याचेही समोर आले आहे.

दरम्यान, १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ७:२० वाजण्याच्या सुमारास काजल हिने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिच्या सासऱ्यांनी ही माहिती कुटुंबीयांना दिल्यानंतर तिला तत्काळ घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर कुटुंबीयांनी 'पतीच्या सततच्या छळामुळेच काजलने टोकाचा निर्णय घेतला' असा आरोप करत अमोल लघाणे याच्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

(पान १ वरुन)

## तुम्हाला 'अश्मयुगात पोहोचवू'...

डिफेन्स असेट्स अजूनही सुरक्षित आणि कार्यरत आहेत हे देखील स्पष्ट केले. "असे गृहीत धरल्याने, तुम्ही ज्या दलदलीत अडकलेले आहात ती अधिकच खोल होत जाईल," असे ते म्हणाले.

ट्रम्प आपल्या भाषणात म्हणाले होते की इराणकडे खूप कमी क्षेपणास्त्र लाँचर्स शिल्लक आहेत आणि आणि त्यांची क्षेपणास्त्रे व ड्रोन डागण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे.

इराणच्या अधिकाऱ्याने सांगितले की, ज्या ठिकाणांवर अमेरिकेने हल्ले केले आहेत ते तेवढे महत्त्वाचे नाहीत. "आमचे स्टॅटेजिक मिलिटरी प्रॉडक्शन अशा ठिकाणी होते ज्याबद्दल तुम्हाला काहीही माहिती नाही आणि तेथे तुम्ही कधीच पोहोचू शकणार नाहीत."

## अशोक खरातच्या फरार...

खरातची पत्नी कल्पना खरात फरार झाल्या असून शिर्डी पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे. त्यातच, आरोपी कल्पना खरात परदेशात पळून जाण्याची शक्यता वर्तवली जात होती. कारण, यापूर्वी अशोक खरात देखील परदेशात पळून जाण्याच्या तयारीत होती. मात्र, पोलिसांनी त्याला संधीच दिली नाही, त्याच पार्श्वभूमीवर आता कल्पना खरात यांनाही पळून जाता येऊ नये म्हणून शिर्डी पोलिसांकडून लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली. त्यामुळे, कल्पना खरातची नाकेबंदी झाली आहे.

## भारत आमचा मित्र, काळजी...

याच मार्गावरून जातो.

इराणकडून होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत वारंवार आश्वस्त केले जात असले तरी जमिनीवरील परिस्थिती गुंतागुंतीची बनली आहे. इराणच्या अधिकाऱ्यांनी अद्याप ही सामुद्रधुनी अधिकृतपणे बंद केली नसल्याचे म्हटले आहे, तरीही सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे या मार्गावरून व्यावसायिक जहाजांच्या वाहतुकीत अनेक आव्हाने निर्माण झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून सध्या काही प्रमाणात वाहतूक सुरू असली तरी सध्याच्या परिस्थितीमुळे जहाजांना या मार्गावरून प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे, अशी माहिती इराणच्या सर्वोच्च नेत्याचे भारतातील प्रतिनिधी अब्दुल मजीद हकीम इलाही यांनी दिली.

## सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य;...

न्यायालयाने म्हटलं की, 'तीन महिलांसह सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवण्याची घटना निंदनीय आहे.'

दरम्यान, यावेळी सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल हे सर्वाधिक ध्रुवीकरण झालेलं राज्य असल्याचं म्हटलं आहे. तसेच एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याची ही घटना पूर्वनियोजित आणि हेतुपुरस्सर असल्याचंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याच्या या घटनेचा तपास एनआयए किंवा सीबीआयकडे सोपवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. या बरोबरच आता एसआयआरची प्रक्रिया करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्याचे निर्देश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

## भोंदू अशोक खरातचा आणखी..

शिर्डी पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपींकडून चौकशीदरम्यान ही माहिती उघड झाली आहे. सावकारकी प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार या आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे समोर येत आहेत. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक वेगाने सुरू ठेवला असून, पुढील तपासात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अशोक खरात ८ एप्रिलपर्यंत...

हात आहेत, याचा तपास एसआयटी करत आहे.

तपासात धक्कादायक बाब समोर आली आहे की, खरात हा पीडितेच्या नातेवाईकांकडे वारंवार आधार कार्ड आणि पॅन कार्डची मागणी करत होता. याद्वारे तो संबंधितांची मालमत्ता स्वतःच्या नावावर हडपण्याच्या बेतात होता का? या दिशेने आता एसआयटीने तपासाची चक्रे फिरवली आहेत. आरोपी तपासात सहकार्य करत नसल्याचा दावाही सरकारी पक्षाने केला.

## ब्रिटिश पंतप्रधानांनी भारताला...

मार्गांपैकी एक मार्ग ठप्प झाला असून, त्यामुळे शेकडो जहाजे अडकून पडली आहेत.

होर्मुझ शिखर परिषद हे एक राजनैतिक-सागरी समन्वय व्यासपीठ आहे. तीन प्रमुख मुद्द्यांवर रणनीती आखण्यासाठी सुमारे ३०-३५ देश एकत्र येत आहेत.

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडकलेल्या जहाजांची वाहतूक पुन्हा सुरू करणे, अडकलेल्या जहाजांची आणि खलाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे, जागतिक तेल आणि वायू पुरवठा साखळी पुन्हा सुरू करणे, या विषयांवर ब्रिटिश परराष्ट्र सचिव इव्हेट कूपर या बैठकीचे नेतृत्व करत आहेत. या बैठकीच्या पहिल्या टप्प्यात राजनैतिक आणि राजकीय पर्यायांवर चर्चा केली जात आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत भारताच्या चिंतेविषयी, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, 'एलपीजी, एलएनजी आणि इतर उत्पादने वाहून नेणाऱ्या जहाजांसह आमच्या जहाजांसाठी अखंड आणि सुरक्षित मार्ग कसा सुनिश्चित करता येईल, हे पाहण्यासाठी आम्ही इराण आणि तेथील इतर देशांच्या संपर्कात आहोत. गेल्या काही दिवसांतील चर्चेमुळे, आमची सहा भारतीय जहाजे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे प्रवास करू शकली आहेत आणि आम्ही संबंधित पक्षांच्या सतत संपर्कात आहोत.

## दररोज कोलांटउड्या मारणे बंद करा

आहेत. इराण युद्धाबद्दल डोनाल्ड ट्रम्प यांच्या विसंगत आणि वारंवार बदलणाऱ्या भूमिकांवर बोट ठेवत मॅक्रॉन म्हणाले की, 'तुम्ही दररोज स्वतःच्याच केलेल्या विधानांचा विरोध करू शकत नाही.' मॅक्रॉन हे दक्षिण कोरियाच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीदरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मॅक्रॉन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह केले.

त्याचबरोबर हॉर्मुझ सामुद्रधुनी लष्करी बळाचा वापर करून पुन्हा सुरू करण्याचा अमेरिकेचा विचार हा वास्तवाला धरून नसल्याचे सांगत त्यांनी तो फेटाळून लावला. इमॅन्यूएल मॅक्रॉन म्हणाले, 'तुम्हाला जर खरंच गांभीर्याने काम करायचे असेल, तर तुम्ही आदल्या दिवशी जे बोललात, त्याच्या अगदी विसंगत दुसऱ्या दिवशी बोलू नका. कदाचित तुम्ही रोज न बोललेलेच बरे होईल', अशा शब्दात त्यांनी सुनावले. 'अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये लष्करी हस्तक्षेप करणे धोक्याचे ठरेल, कारण त्यामुळे तेथील व्यापारी जहाजे इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स आणि मिसाईल हल्ल्यांच्या टप्प्यात येतील', असा सावधगिरीचा इशाराही मॅक्रॉन यांनी ट्रम्प यांना दिला. 'या संघर्षावर लष्करी कारवाई हा उपाय नाही, 'शस्त्रसंधी करणे आणि इराणसोबत पुन्हा चर्चा सुरू करणे' हाच एकमेव मार्ग त्यावर आहे असे मॅक्रॉन म्हणााले.

## शिंदेंच्या शिवसेनेसह....

सुनावणीसंदर्भात विचार केला तर ते गंभीरपणे घेतले जात नाही. न्यायाधीशांना दबाव असेल तर सांगितले पाहिजे. यावर काहीतरी उत्तर मिळावे म्हणून आम्ही कोर्टात गेलो आहोत. निवडणूक आयोगावर संशय घेता येत नाही असे म्हणणाऱ्या सुप्रीम कोर्टावरच संशय यायला लागला आहे. संविधानिक संस्थेवरच लोकांना संशय येत आहे. अनेक राज्यात बोगस मतदान झाले. त्याच पद्धतीने पश्चिमबंगालमध्ये होणार. नाहीतर कोण एकनाथ शिंदे त्यांचे इतके उमेदवार कसे विजयी होतात असे राऊत म्हणाले.